सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
राष्ट्रीय सेवा योजना
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

प्रो. (डॉ.) सदानंद भोसले
एम्.ए., पीएच् डी.
संचालक (अतिरिक्त कार्यभार)

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

कार्यालय क्र. : ०२०–२५६२२६८८/८९
: ०२०–२५६२२६९०/९१
: ०२०–२५६२२६९२
: ०२०–२५६९७३४१

संदर्भ : रासेयो/२०२३–२४/४९० दि. ०९/१२/२०२३

प्रति,
मा.प्राचार्य/संचालक,
रासेयो संलग्नित सर्व महाविद्यालये परिसंस्था,
पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ.

विषय : अवयवदान जनजागृती ऑनलाइन प्रशिक्षण उपक्रमाबाबत

महोदय,

दर दोन मिनिटाला प्रत्यारोपणासाठी अवयव न मिळाल्याने, मृत्यूशैयेवरील एका रूग्णाचे, अवयव प्रतीक्षा यादीवरच निधन होते. रस्त्यावरील अपघातात दरवर्षी निधन पावणाऱ्या दीड लाख व्यक्तींचे जर अवयवदान जागृतीने अवयव दात्यांत रूपांतर करता आले, तर प्रत्येक रूग्णाला जीवनदायी अवयव मिळेल. म्हणूनच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजना विभाग, इंडियन मेडिकल असोसिएशन महाराष्ट्र राज्य व व्हीफॉर ऑर्गन्स फाउंडेशन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने रासेयो संलग्नित महाविद्यालयातील स्वयंसेवक व अन्य विद्यार्थ्यांना अवयवदान जागृतीचे ऑनलाइन प्रशिक्षन देण्याचा उपक्रम गतवर्षी सुरू करण्यात आलेला आहे.

सदर प्रशिक्षण आठ प्रकरणात विभागले असून, प्रशिक्षण सामुग्री सॉफ्ट कॉपी स्वरूपात तयार आहे. विद्यार्थ्यांना आपल्या मोबाईलचा वापर करून, वैयक्तिक सोयीच्या वेळेत, सोयीच्या ठिकाणी अभ्यास करून हे प्रशिक्षण २६ जानेवारी २०२४ पूर्वी पूर्ण करायचे आहे. प्रशिक्षण पूर्णपणे मोफत असून, ते पूर्ण झाल्यावर प्रत्येकाला ई–सर्टिफिकेट मिळेल. त्याशिवाय ज्या कॉलेजचे सर्वाधिक विद्यार्थी प्रशिक्षण पूर्ण करतील अशा प्रत्येक कॉलेजच्या रासेयो विद्यार्थी प्रमुखंना शंभर विद्यार्थ्यांमागे एक या प्रमाणात शिष्यवृत्ती देऊन त्यांच्या कार्याचा सन्मान करण्यात येईल व त्यातील प्रथम दहा क्रमांकांना शिष्यवृत्ती देण्यात येईल.

प्रशिक्षणासाठी नोंदणी आवश्यक असून त्यासाठी पुढीलप्रमाणे गुगल फॉर्मची लिंक देण्यात आलेली आहे. नोंदणी फॉर्म सोबत पहिल्या प्रकरणाच्या अभ्यास सामुग्रीची लिंक मिळेल आणि त्यानंतर क्रमश: पुढील प्रकरणांच्या लिंक मिळतील. प्रकरणावर छोटेसे व्याख्यान, माहिती पुरवणी, प्रश्नमंजुषा व छोटासा आकर्षक अवयव दानावरील व्हिडिओ असे अभ्यास सामुग्रीचे घटक असतील. त्यासाठी रासेयोची प्रस्थापित वितरण व्यवस्था वापरली जाईल. रासेयो कार्यालयातून जिल्हा व विभाग समन्वयक व त्यानंतर त्यांच्याकडून कार्यक्रम अधिकारी यांच्यामार्फत रासेयो स्वयंसेवक व इतर विद्यार्थ्यांपर्यंत, प्रशिक्षण साहित्याचे वितरण केले जाईल. महाविद्यालयाच्या स्तरावर योजना कार्यान्वित करण्यासंबंधी येणाऱ्या अडचणींसाठी मार्गदर्शक सूचना मिळणे व इतर माहितीकरिता टेलिग्राम समूह तयार केला आहे. यामध्ये सर्व रासेयो कार्यक्रम अधिकारी यांनी सहभागी व्हावे. महाविद्यालयनिहाय प्रशिक्षणासाठी किती विद्यार्थ्यांची नोंदणी व किती विद्यार्थ्यांचे प्रशिक्षण पूर्ण झाले याची माहिती येथे सर्वांना मिळेल.

तरी अवयवदान जनजागृती ऑनलाइन प्रशिक्षण उपक्रमामध्ये आपल्या महाविद्यालयातील अधिकाधिक स्वंयसेवक, विद्यार्थी, प्राध्यापक व शिक्षकेत्तर सेवक यांना सहभागी होण्याबाबत सूचित करावे. कळावे, ही विनंती.

संचालक
राष्ट्रीय सेवा योजना

प्रशिक्षण माहिती लिंक :
**https://drive.google.com/file/d/1vR-Ybo3i3clKE2ZXS-TxTV-Dv6BU8iUo/view?usp+sharing**
प्रशिक्षण नोंदणी फॉर्म लिंक :
**https://docs.google.com/forms/d/e/1FAIpQLSe65phhR6XP5c5K5tKk-KRMklX6el2-HwAUsB6R-Rrz4SGoxg/viewform**
अधिक माहितीकरिता संपर्क : श्री. श्रीकांत आपटे –९८२००७८२७३